FORM-1A 0058164 N.C.R.B. I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

## फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 16 वर्ष Year 2024 दिनांक Date 17/05/2024
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि १९८८ कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार, तारीख पासून Date from 09/05/2024 वेळ Time – तारीख पर्यंत Date to 16/05/2024 वेळ Time 15:02
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 09/05/2024 वेळ Time ........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02 तारीख Date 17/5/2024 वेळ Time 09:05 वा
4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. 20 k.m उत्तर दिशा, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बिल्डींग, ठिकाणाचे नंबर No. if any नं. 19, गल्ली Ward पहिला माळा, रस्त्याचे नाव Name of road जिल्हाळ्या बाजूची
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place उत्तरीकडील, गाव Village रुम, पोस्ट Post सशस्त्र, तालुका Taluka पोलीस, जिल्हा Dist. दल, राज्य State मरोळ (ल.वि.04)
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name भाऊसाहेब रामनाथ साबळे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रामनाथ साबळे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 44 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9377199715
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी (पो.हवा 06-0090)
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste –, जनजात Sub-Caste –
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward बिल्डींग, घर / नाव नं. House/Name No. नं. 110, फोन / मो. नं. Phone/M. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place , रुम, गाव Village 3700, पोस्ट Post , चौथा पो. स्टे. P. Stn. माळा
   तालुका Taluka नेहरुनगर, जिल्हा Dist. कुर्ला (पूर्व), राज्य State मुंबई सध्याचा पत्ता Present Address ........
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   सुयश शरद कांबळे पो.शि.क्र 200061 सशस्त्र पोलीस मुख्यालय, मरोळ (ल.वि.04) मुंबई पत्ता - रुम नं 306, 312, 05 बी, मजास वाडी, म्हाडा पोलीस वसाहत, अंधेरी (पूर्व) मुंबई

Y.P.P.–3,200 Bk.–(25×6=150 Lvs)–3-2021–PA3–(K) 347

यातील फिर्यादी भाऊसाहेब साबळे यांची फिर्याद ही स्वतंत्र कागदावर टंकलेखित केली असुन ती प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Sunita dighe 17/05/2024

(सुनिता दिघे),

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

भाऊसाहेब रामनाथ साबळे

फिर्याद

दि. १७/०५/२०२४

श्री. भाऊसाहेब रामनाथ साबळे वय ४४ वर्षे धंदा : नोकरी, (पोलीस हवालदार क्र. ०६.००९०/स.पो मरोळ, ल.वि.४, मरोळ, मुंबई), राठी : बिल्डिंग क्र. ११०, खोली क्र. ३७००, ४ था माळा, नेहरु नगर, कुर्ला, मुंबई २४, मो.क्र. ७९७७१९९७१५.

००००

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझे पत्नी व मुलासह रहावयास आहे. मी बृहन्मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई या पदावर सन २००६ साली भरती झालो आहे. मला मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझे कुटूंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

मी सन २०१९ पासून स.पो. मरोळ, ल. वि ४, मुंबई येथे 'एच' कंपनीत पोलीस हवालदार म्हणून कार्यरत आहे. मी मागील तीन महिन्यापासून कुर्ला कोर्ट मेनगेटला गार्ड कर्तव्य करत आहे. परंतु दिनांक ०१/०५/२०२४ रोजी स.पो. मरोळ, ल. वि ४ चे गार्ड बदली झाल्याने कुर्ला कोर्ट 'एच' कंपनीला नसल्याने 'एच' कंपनी मदतनीस, कारकुन, स.पो. मरोळ, ल. वि ४, मरोळ, मुंबई येथील पो.शि.क्र. २०००६१/कांबळे यांनी मला फोन करुन सांगितले की, "तुम्हाला आता दुसरीकडे डयुटी देतो" परंतू मी त्यांना "तिथेच राहू दे" म्हणालो पण पो.शि.क्र. २०००६१/कांबळे हे ठेवयाला तयार नव्हते, मी बोललो की, "मरोळला येवून स.पो.आ कपिले मॅडम यांना भेटून विनंती करतो. तो पर्यत तुम्ही मला तिथेच राहू दया". त्यानंतर मी दिनांक ०७/०५/२०२४ रोजी मरोळ येथे जावून स.पो.आ कपिले मॅडम यांना भेटलो त्यांनी मला हस्तक्षेप करता येणार नाही. तुम्ही डी.सी.पी साहेब आल्यावर त्यांना भेटा असे सांगितले.

दिनांक ०८/०५/२०२४ रोजी दुपारी १६:४८ वा पो.शि.क्र. २०००६१/कांबळे यांनी मला त्यांचा मोबाईल क्र. ८३६९२४९३६७ यावरुन फोन केला आणि म्हणाले की, "कुर्ला कोर्ट गार्ड हे दुसऱ्या कंपनीवाला आपल्याला देत नाही, त्यापेक्षा तुम्ही ८ ते १० हजार रुपये देवून महिनाभर येवूच नका घरीच थांबा असे बोलला" मी त्यांना सांगीतले की मला गावी जायचे नाही मला सुट्टी नको, मला कुर्ला कोर्टला डयुटी दया." तरी ते मला बोलले की दोन दिवसात तुमचा विचार करुन मला कळवा. ८ ते १० हजार रुपये देवून गावाला जा, नाहीतर दुसरीकडे गार्डला जा. पो.शि.कांबळे यांचे कंपनी मदतनीस म्हणून मला कर्तव्य देणे हे त्यांचे कायदेशीर काम आहे. मला सुट्टीची आवश्यकता नाही असे सांगुन, पण त्यांनी बेकायदेशीरपणे गावाला जा आणि महिनाभर येवू नका असे सांगून त्यांनी माझेकडे ८ ते १० हजार रुपये लाचेची मागणी केली.मला पो.शि.क्र. २०००६१/कांबळे यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांचेविरूध्द दिनांक ०९/०५/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयात येवून तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटुन माझी तक्रार स्वहस्ताक्षरामध्ये लिहुन तक्रारअर्ज दिला. त्याप्रमाणे त्यांनी माझे तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता तपासी अधिकारी म्हणून पो.नि सुनिता दिघे व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून स.पो.आ भारती मोरे यांची नेमणुक करून पुढील कारवाई केली.

मी केलेल्या तक्रारी अर्जानुसार पडताळणी करण्याकरीता दिनांक १०/०५/२०२४ रोजी ला.प्र.वि, कार्यालयात हजर राहिलो. सदर पडताळणी कारवाई करिता पोलीस पथक व पंच यांचेसह लोकसेवकाच्या कार्यालयात गेलो असता लोकसेवक बाहेर असल्याने फोनवर बोलणे झाले परंतु भेट झाली नाही. त्यानंतर मला

समक्ष,

Sunitadighe 17/05/2024

(सुनिता दिघे)

पोलीस निरीक्षक

लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,

बृहन्मुंबई विभाग, मुंबई

भाऊसाहेब रामनाथ साबळे

दिनांक १०/०५/२०२४ रोजी अंदाजे १८:११ वा च्या सुमारास लोकसेवक कांबळे यांचा माझे मोबाईल फोनवरती फोन आला असता, त्यांनी सांगितले की, ''आज साप्ताहिक आहे ना, उदया कामावर जाऊ नका, मी सांगेन तो पर्यत जावूच नका'' असे सांगितले. त्यानंतर दि.११/०५/२०२४ रोजी १७:०७ वा ''मला फोन केला व कार्यालयात येवुन भेटा असे सांगितले. दि.११/०५/२०२४ रोजी पासुन पो.शि. कांबळे यांना मला कोणतेही कर्तव्य दिले नाही.

त्यानुसार दिनांक. १२/०५/२०२४ रोजी मी, पोलीस पथक व शासकीय पंचासह पडताळणी करिता लोकसेवकाचे कार्यालय स.पो. मरोळ, ल. वि ४, मुंबई येथे गेलो. सदर वेळी पो.नि सुनिता दिघे यांनी पो.ह रावराणे यांच्या मदतीने माझ्या शर्टच्या आतील बनियानला डिव्हिआर मशीन लावून पो.शि.क्र. २०००६१/कांबळे यांना भेटण्यास गेलो असता लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट झाली. पो.शि.२०००६१/कांबळे यांनी माझेकडे दिवसाला रु. ४००/– प्रमाणे लाचेची मागणी करुन तडजोडीअंती दिवसाला रु. ३००/– रुपये प्रमाणे लाच स्विकारण्याचे कबुल केले. माझे व श्री. कांबळे यांचेमध्ये झालेले संभाषण तपासी अधिकारी म.पो.नि सुनिता दिघे यांनी त्यांचेकडील डिव्हीआर मशीनव्दारे मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनीमुद्रित आलेल्या संभाषणाचे माझे मदतीने ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात आले आहे.

मी आज दिनांक १६/०५/२०२४ रोजी ला.प्र.वि, मुंबई कार्यालतील पो.नि सुनिता दिघे यांच्या दालनात स्वतःहून हजर झालो. त्यानंतर म.पो.नि सुनिता दिघे व पर्यवेक्षक अधिकारी पो.नि.चौगूले यांनी मला, पंच व पोलीस पथकास सापळापूर्व/सापळा कारवाईच्या दृष्टीकोनातून घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या व मला लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितली. त्याप्रमाणे रु. ५००/– दराच्या ०३ नोटा व रु. १००/– दराच्या ०३ नोटा असे एकूण १८००/– हजर केले. सदर लाचेच्या रक्कमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशात अलगद ठेवण्यात आली व मला सदर लाचेच्या रक्कमेस हात न लावण्याच्या तसेच लोकसेवक लाचेची रक्कम मागणी केल्यावर उजव्या खिशातील लाचेची रक्कम उजव्या हाताने देण्याबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर मी, शासकीय पंच व सापळा पथक असे पुढील कार्यवाहीकरीता ला.प्र.वि कार्यालयातून सी लिंक, पश्चिम दुव्रगती मार्गाने अंधेरी, मरोळच्या दिशेने रवाना झालो. त्यानंतर आम्ही सेवनहिल रुग्णालयासमोरील बाजूस पो.नि सुनिता दिघे यांनी पो.ह/रावराणे यांचे मदतीने माझे शर्टच्या आतील बनियानला डिव्हीआर मशीन लावून चालू केली. त्यांनतर मी व पंच क्र ०१ मयुरेश देसाई असे स.पो. मरोळ, ल. वि ४, मुंबई येथील मरोळ पोलीस वसाहत डी/११ मधील पहिल्या मजल्यावरील जिन्याच्या उजव्या बाजूकडील खोली मध्ये जावून पो.शि.क्र. २०००६१/कांबळे यांची भेट घेतली असता, **मी त्यांना विचारले...''सहा दिवसाचे ते...तिनशे रुपयाने...तुम्हा बोलल्याप्रमाणे...हे''...त्यावेळेस कांबळे म्हणाले...''चारशे बोलले...बरं करा तिनशेने चला...अं...हा''** असे बोलून माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी केली. त्यानुसार मी उजव्या हाताने माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशातील रू. १८००/– लाचेची रक्कम कांबळे यांना दिली. सदर रक्कम कांबळे यांनी ती घेवून टेबलच्या व ड्रॉव्हरच्या मधील मोकळया जागेत ठेवले असल्याचे दिसून आले. त्यावेळी मी व पंच सदर खोलीतून बाहेर आलो. मी माझ्या डोळयावरील चष्मा काढून चष्म्याच्या कापडाने वारंवार चष्मा पूसत राहिलो हा पूर्वनियोजित इशारा केला. सदर बिल्डिंगच्या तळमजला व पहिल्या मजल्यावर दबा धरून बसलेले सापळा पथकाने मला खुणावले असता मी त्यांना अंगूलीनिर्देश करुन सांगितले. त्याप्रमाणे सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पो.शि कांबळे यांच्या कक्षात प्रवेश केला व पो.शि कांबळे यांना ताब्यात घेतले व मला लावण्यात आलेले डिव्हिआर पोलीस अमंलदारकरवी पो.

समक्ष,

Sunitadighe 17/05/2024
(सुनिता दिघे)
पोलीस निरीक्षक
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

[signature]
भाऊसाहेब रामनाथ साबळे

नि. दिघे यांनी घेतले. पो.शि.क्र. २०००६१/कांबळे यांना ताब्यात घेवून ला.प्र.वि मुंबई कार्यालयास पुढील कारवाईकरीता रवाना होत असलेबाबतची नोंद सशस्त्र पोलीस दल ठाणे अंमलदार कक्ष, मुंबई येथे नोंद घेतली. त्यानंतर आम्ही पुढील कारवाईकरीता शासकीय वाहनाने लाप्रवि, वरळी, मुंबई कार्यालयास आलो.

तरी लोकसेवक सुयश शरद कांबळे, ३४ वर्षे, राठी : म्हाडा पोलीस वसाहत, ५/बी, खोली क्र. ३०६, ३१२, मज्जास वाडी, पी एम जी पी कॉलनी जवळ, अंधेरी पूर्व, मुंबई यांनी मी मागत असलेली गार्ड डयुटी देता येत नसल्याने त्यापेक्षा तुम्ही ०८—१० हजार रूपये दया व कर्तव्यावर महिनाभर येवु नका असे सांगितले. पडताळणी मध्ये कांबळे यांनी प्रतिदिनी रु. ४००/— असे सांगून तडजोडीअंती प्रतिदिनी रु. ३००/— या प्रमाणे मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. दि.१६/०५/२०२४ रोजी ०६ दिवसाचे १८००/— रूपये इतकी लाचेची रक्कम स्विकारली म्हणून माझी त्यांच्याविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझे श्री. सुयेश शरद कांबळे यांच्याशी कोणतेही पूर्व वैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही

माझा वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून, तो मी मराठीत वाचून पाहिला असता, तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,
Sunitadighe 17/05/2024
(सुनिता दिघे)
पोलीस निरीक्षक
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

भाऊसाहेब रामनाथ साबळे

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......तात्काळ......

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. ★ चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......................................

Total Value of properties stolen / involved —

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......................................

Unnatural / Accidental Death Case No., if any —

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी तक्रारदार हे मागुन असलेली शाउ ड्युटी देता येत नसल्याने त्यापेक्षा तुम्ही ०४-१० हजार रुपये द्या व कर्तव्यावर महिनाभर येवु नका असे सांगितले. पडताळणी मध्ये आलोसे यांनी प्रतिदिनी ५००/- रुपये व तडजोडी अंती ३००/- रुपये प्रमाणे मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. आज दि. १८/०३/२०२४ रोजी पंचासमक्ष केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडून प्रतिदिन ३००/- रुपये प्रमाणे एकुण ०६ दिवसाचे १८००/- रुपये इतकी लाचेची रक्कम स्विकारताना

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : रंगेहाथ पकडले म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन......................, जिल्हा.................., राज्य..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to................................................... (3) Transferred to P. S. ..................................................

District................................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...सुनिता पांडुरंग दिघे

पदनाम Rank...पोलीस निरीक्षक,

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ..............................................

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**